# गद्यांशाः।

**गद्यांशं पठित्वा माध्यमभाषया अनुवादं कुरुत।**

१. मुखोद्गतं क्रियमाणं पठनं नाम मण्डूकानां रटनम् इति उक्त्वा केचिद् जनाः उपहसन्ति।
तोंडपाठ केले जाणारे पठण म्हणजे बेडकांचे ओरडणे होय असे म्हणून काही लोक टिंगल करतात.

किन्तु शैशवे मुखोद्गतं कृतं पठनं वार्धक्ये अपि साहाय्यकारी भवति एषः अनुभवः।
परंतु बालपणी तोंडपाठ केलेले पठण म्हातारपणीही मदत करणारे ठरते, असा अनुभव आहे.

यः भृशं मुखोद्गतं करोति तस्य पुरतः विविधानि शास्त्राणि अञ्जलिं बद्ध्वा तिष्ठन्ति।
जो पुष्कळ पाठांतर करतो, त्याच्यासमोर वेगवेगळी शास्त्रे हात जोडून उभी राहतात.

प्रत्युत यः न करोति स स्वल्पकार्याणां कृते विविधान् कोशान् पश्यति।
उलट जो ते करीत नाही, तो लहान-सहान कामांसाठी वेगवेगळे कोश पाहतो.

संदर्भस्थलानि विचिनोति अथवा कमपि विद्वांसं पृच्छति।
संदर्भस्थळे गोळा करतो किंवा कोण्या पंडितास विचारतो.

एषः कालापव्ययः।
हा वेळेचा अपव्यय होय.

अथवा अनिश्चितं ज्ञानम् अवलम्ब्य स किमपि वदति यद् न विश्वासार्हम्।
किंवा संदिग्ध ज्ञानावर अवलंबून तो असे काहीतरी बोलतो जे विश्वासपात्र नसते.

मौक्तिकम् अपेक्षमाणः मनुजः सागरतलमेव गन्तुमर्हति।
मोत्याची इच्छा करणाऱ्या मनुष्याने समुद्राच्या तळाशीच जायला हवे.

२. नैकदा व्यवहारे अहं वञ्चितोऽस्मि इति मनुजः स्वयं जानाति।
अनेकदा व्यवहारात मी फसविला गेलो आहे, हे मनुष्य स्वतः जाणतो.

तदा अहं मूर्खोऽस्मीति स वदति।
तेव्हा 'मी मूर्ख आहे' असे तो म्हणतो.

किन्तु यदि अन्यः कोऽपि तं मूर्खमिति सम्बोधयति तदा सः क्रुद्धः भवति।
परंतु जर दुसऱ्या कोणीही त्यास 'मूर्ख' असे संबोधले, तर तो संतापतो.

मनुजः जानीयात् यदि अहं क्रुध्यामि तर्हि अहमेव मम शत्रुः।
मनुष्याने लक्षात घ्यावे, की जर मी चिडलो तर मीच माझा शत्रू ठरेन.

यदि अहं स्निह्यामि तर्हि अहमेव मम मित्रम्।
जर मी प्रेम केले, तर मीच माझा मित्र होईन.

कल्पनयैव वयमन्यान् जनान् अमित्रम् अथवा मित्रं मन्यामहे।
कल्पनेनेच आपण इतर लोकांना शत्रू किंवा मित्र मानतो.

यो मम अहंकार पुष्यति स मम सखा।
जो माझा अहंकार पोसतो; तो माझा मित्र.

यो मम अहंकारं दुनोति स मम वैरी।
जो माझा अहंकार दुखावतो; तो माझा शत्रू.

संक्षेपतः मम मनः एव मम शत्रुः अथवा मम मित्रम्।
थोडक्यात माझे मनच माझा शत्रू किंवा माझा मित्र असतो.

३. निदाघसमये मध्याह्ने एक: पथिक: मार्गेण गच्छति स्म।
उन्हाळ्यात दुपारी एक वाटसरू रस्त्याने जात होता.

मार्गम् उभयत: आम्रवृक्षा: सन्ति।
रस्त्याच्या दुतर्फा आंब्याची झाडे होती.

तत्र स खगानां कलरवं शृणोति।
तेथे त्याने पक्ष्यांचा किलबिलाट ऐकला.

वृक्षच्छायायाम् उपविश्य श्रान्त: स आम्रफलानि भक्षयति।
झाडाच्या सावलीत बसून थकलेल्या त्याने आंबे खाल्ले.

संतुष्ट: भूत्वा स वृक्षान् प्रशंसति, 'धन्या: ते महीरुहा: छायापत्रसमान्विता: येभ्य: निराशा: न यान्ति पान्थस्था:।'
तृप्त होऊन त्याने झाडांची स्तुती केली, 'सावली व पाने यांनी युक्त असलेली ती झाडे धन्य होत; ज्यांच्यापासून वाटसरू निराश, होऊन जात नाहीत'.

पथिक: मनसि सङ्कल्पं करोति, 'अहमपि स्वगृहे वृक्षान् आरोपयिष्यामि।'
वाटसरू मनात संकल्प करतो, 'मीही माझ्या घरी झाडे लावेन.'

४. पारम्परिकपाठशालासु ये छात्रा: संस्कृताध्ययनं कुर्वन्ति तेऽपि आधुनिकजगत: परिचयं सम्पादयन्तु।
पारंपरिक शाळांमध्ये जे विद्यार्थी संस्कृतभाषेचा अभ्यास करतात, त्यांनीही आधुनिक जगाची ओळख (माहिती) मिळवावी.

समाचारपत्रपत्रिकादय: पठनीया:।
वृत्तपत्रे, नियतकालिके इत्यादी वाचावीत.

यदि विज्ञानवाणिज्यतन्त्रज्ञान - उद्योगादिषु क्षेत्रेषु वर्तमानप्रगतीनां परिचय: अस्माकं न भवति तर्हि देशकालं च अवगन्तुं न शक्नुम:।
जर विज्ञान, व्यापार, तंत्रज्ञान, उद्योग इत्यादी क्षेत्रांतील चालू असलेल्या विकासाची आपल्याला ओळख नसेल, तर आपण तात्कालिक परिस्थिती (देश,काल) आपण समजून घेऊ शकत नाही.

जनै: सह मेलितुं वार्तालापं कर्तुं च न शक्नुम:।
लोकांशी मिसळून आपण संवाद साधू शकत नाही.

५. एकदा दुर्बुद्धि: आनन्दमग्नं सुबुद्धिम् अपृच्छत्, 'भवत: आनन्दस्य शान्तेश्च किं रहस्यम्?'
एकदा दुर्बुद्धीने आनंदात रममाण असलेल्या सुबुद्धीला विचारले, 'आपल्या आनंदाचे व शांतीचे रहस्य काय?'

सुबुद्धि: उवाच, 'मित्र। मम चत्वार: अङ्गरक्षका: सन्ति।
सुबुद्धी म्हणाला, 'मित्रा, माझे चार अंगरक्षक आहेत.

प्रथमं तु सत्यं यत् माम् अपराधात् सर्वदा रक्षति।
पहिला 'सत्य' जो माझे नेहमी अपराधापासून रक्षण करतो.

द्वितीय: स्नेह:, अहं सर्वान् कर्मचारिण: पुत्रवत् मन्ये।
दुसरा 'स्नेह', मी (माझ्या) सगळ्या सेवकांना मुलाप्रमाणे मानतो.

तृतीय: न्याय:, य: मामन्यायात् रक्षति।
तिसरा 'न्याय' जो मला अन्यायापासून वाचवितो.

चतुर्थ: त्याग:, मां दानाय प्रेरयति।
चौथा 'त्याग' जो मला दान करण्यास उद्युक्त करतो.

अत: एतेषां सहायतया अहं सर्वदा आनन्देन जीवामि लोकहितं च करोमि इति।'
म्हणून यांच्या मदतीने मी नेहमी आनंदाने जगतो आणि लोककल्याण साधतो.'

दुर्बुद्धि: श्रद्धया तस्य चरणयो: अपतत्।
दुर्बुद्धी श्रद्धेने त्याच्या पाया पडतो.

६. भारतीया संस्कृतिः संस्कृतभाषामाश्रित्य तिष्ठति।
भारतीय संस्कृती संस्कृत भाषेचा आश्रय घेऊन राहिली आहे.

भारतस्यात्मा संस्कृत्या प्रकाशते।
भारताचा आत्मा संस्कृतभाषेमुळे तेजस्वी दिसतो.

संस्कृतभाषायाः पुनरुज्जीवनं तदा भविष्यति यदा जनजीवनस्य प्रत्येकं क्षेत्रे संस्कृतस्य प्रयोगः भवेत्।
संस्कृतभाषेचे पुनरुज्जीवन तेव्हा होईल; जेव्हा लोकजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संस्कृतचा वापर होईल.

संस्कृतभाषा यदा भारतस्य व्यवहारभाषा आसीत् तदा भारतं 'विश्वगुरुः' इति ख्यातिमलभत।
संस्कृतभाषा जेव्हा भारताची व्यवहारभाषा होती, तेव्हा भारतालां विश्वगुरू म्हणून प्रसिद्धी मिळाली होती.

विदेशेभ्यः छात्रा अत्र अध्ययनार्थमागच्छन्ति स्म।
परदेशांतून विद्यार्थी येथे अभ्यासासाठी येत असत.

नालन्दा-तक्षशिला-आदि-विश्वविद्यालयेषु विविधानि शास्त्राणि तेभ्यः पाठयन्ते स्म।
नालंदा, तक्षशिला इत्यादी विश्वविद्यालयांमध्ये वेगवेगळी शास्त्रे त्यांना शिकविली जात.

पुनः विश्वगुरुत्वं प्राप्तुं भारतेन संस्कृतस्य अवलम्बनं करणीयमेव।
(आता) पुन्हा 'विश्वगुरुपद' मिळविण्यासाठी भारताने संस्कृतचाच आश्रय घ्यावा.

७. दक्षिण भारते सागर-मध्ये एकं लघुद्वीपं वर्तते।
दक्षिण भारतात समुद्रामध्ये एक लहानसे बेट आहे.

तस्मिन् द्वीपे सागरतरङ्गैः क्षाल्यमानं प्राचीनं नगरं कन्याकुमारी इति अस्ति।
या बेटावर समुद्राच्या लाटांनी न्हाऊन निघणारे 'कन्याकुमारी' नावाचे नगर आहे.

त्रयाणां सागराणां जले प्रतिबिम्बितं सूर्योदयस्य दृश्यम् अद्भुतमेव।
तीन समुद्रांच्या पाण्यात प्रतिबिंबित झालेले सूर्योदयाचे दृश्य आश्चर्यकारकच असते.

सूर्यस्य क्रमशः अरुणा पीता धवला च शोभा दर्शकान् मन्त्रमुग्धान् करोति।
सूर्याचे क्रमाक्रमाने होत जाणारे आरक्त, पिवळे व शुभ्र असे तेज प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करते.

एकदा स्वामिविवेकानन्दः समुद्रजले स्थितायामेकस्यां बृहत्-शिलायाम् उपविष्टः त्रीणि दिनानि ध्यानमग्नः जातः।
एकदा स्वामी विवेकानंद समुद्राच्या पाण्यात असलेल्या एका मोठया शिळेवर बसले आणि तीन दिवस ध्यानमग्न झाले.

एतस्यां शिलायाम् एव विवेकानन्दकेन्द्रं विकसितमस्ति।
याच शिळेवर विवेकानंद केंद्र विकसित झाले आहे.

अत्र आगत्य साधकाः ध्यानं साधनां च कृत्वा जीवनं सफलं कुर्वन्ति।
येथे येऊन साधक ध्यान आणि साधना करून जीवन सार्थ करतात.

८. एकदा कश्चित् नरः मृगयार्थम् अगच्छत्।
एकदा कोणी एक मनुष्य शिकारीसाठी गेला.

सः सर्वंदिनं वने अभ्रमत्, किन्तु कमपि पशुं नापश्यत्।
तो संपूर्ण दिवसभर अरण्यात भटकला, परंतु (त्याने) एकही वन्यप्राणी पाहिला नाही.

सायंकाले यदा स्वगृहं प्रति आगच्छति स्म, तदा सः एकां पुत्रसहितां हरिणीमपश्यत्।
संध्याकाळी जेव्हा तो आपल्या घराकडे येत होता, तेव्हा त्याने पाडसासह एका हरिणीला पाहिले.

सः नरः अश्वेन तस्याः अनुसरणमकरोत्।
त्या मनुष्याने घोड्यावरून तिचा पाठलाग केला.

किन्तु सा मृगी कुत्रचित् अदृश्या अभवत्।
परंतु ती हरिणी कोठेतरी दिसेनाशी झाली.

अश्वमारूह्य सः नरः किञ्चिद् दूरं गत्वा अपश्यद् यत् पुत्रस्नेहव्याकुला सा मृगी अपि पुत्रमनुसरति स्म।
घोड्यावर बसून त्या मनुष्याने थोडेसे दूर जाऊन पाहिले की पाडसाच्या प्रेमामुळे व्याकुळ झालेली हरिणीही पाडसामागोमाग येत आहे.

सः अचिन्तयत् - एषा हरिणी स्वप्राणमोहं त्यक्त्वा पुत्रं रक्षितुमिच्छति।
त्याने विचार केला-ही हरिणी स्वतःच्या प्राणांचा मोह सोडून पाडसास वाचवू इच्छिते.

अहो ! एतां निराशां न करिष्यामि इति विचार्य सः मृगीशावकम् अमुञ्चत्।
अरे! हिची मी निराशा करणार नाही, असा विचार करून त्याने हरिणीच्या पाडसास सोडले.

हरिणी प्रसन्ना अभवत्।
हरिणी आनंदित झाली.

९. प्रतियोगिताप्रधानमिदं युगम्।
हे युग स्पर्धात्मक आहे.

जीवने विकासाय प्रतियोगितानां महती उपादेयता वर्तते।
जीवनात प्रगतीसाठी स्पर्धांचे मोठे योगदान असते.

मानवः प्रतिस्पर्धया एव उन्नतिपथमारोहति।
मनुष्य दुसऱ्याशी स्पर्धा करूनच प्रगतिपथावर जातो.

प्रायशः ये गुणाः बालकेषु सुप्तरूपेण विद्यन्ते, तेषां विकासाय प्रतियोगिताः अनिवार्याः एव।
बहुतकरून जे गुण लहान मुलांमध्ये सुप्त रूपाने असतात, त्यांच्या वर्धनासाठी स्पर्धा अनिवार्यच आहेत.

यदा बालाः छात्रजीवने अनेकासु प्रतियोगितासु सहभागिनः भवन्ति, यथा भाषण-निबन्धलेखन-चित्ररचना-वाद-विवाद क्रीडादीनां प्रतियोगिताः, तदा एताभिः तेषा क्षमतानां विकासः भवति।
जेव्हा मुले विद्यार्थिजीवनात अनेक स्पर्धांमध्ये सहभागी होतात, जसे भाषण, निबंधलेखन, चित्र रेखाटणे, वादविवाद, खेळ इत्यादी स्पर्धा; तेव्हा यांमुळे त्यांच्या क्षमतांचा विकास होतो.

अतः जीवने सर्वाङ्गीणविकासाय प्रतियोगितासु सहभागः ग्रहीतव्यः।
म्हणून जीवनात सर्वांगीण विकासासाठी स्पर्धांमध्ये सहभाग घ्यावा.

१०. एकदा राजकुमारः सिद्धार्थः विहारार्थम् उपवनं गतः।
एकदा राजपुत्र सिद्धार्थ फिरण्यासाठी उद्यानात गेला.

बाणेन विद्धः एकः हंसः भूमौ पतितः आसीत्।
बाणामुळे जखमी झालेला एक हंस जमिनीवर पडला होता.

एतद् दृष्ट्वा सिद्धार्थस्य चित्तं करुणया व्याकुलं जातम्।
हे पाहून सिद्धार्थाचे अंतःकरण करुणेने व्याकुळ झाले.

सः धावित्वा हंसस्य शरीराद् बाणं निष्कास्य तमङ्के अधारयत्।
त्याने धावत जाऊन हंसाच्या शरीरातून बाण बाहेर काढून त्याला मांडीवर धरले.

अत्रान्तरे देवदत्तः धावन् तत्र प्राप्तः।
तेवढ्यात देवदत्त धावत तेथे पोहोचला.

सिद्धार्थस्य हस्ते हंसं दृष्ट्वा सः उच्चैः अवदत्, "सिद्धार्थ ! एषः हंसः मया बाणेन निपातितः, अतः मह्यं देहि।"
सिद्धार्थाच्या हातातील हंस पाहून तो मोठ्याने म्हणाला, "सिद्धार्था ! या हंसास मी बाणाने खाली पाडला आहे, म्हणून (तो) मला दे."

सिद्धार्थः दृढतया अवदत्, 'अहं न दास्यामि।
सिद्धार्थ ठामपणे म्हणाला, '"मी देणार नाही.
अहम् अस्य रक्षकोऽस्मि।'
मी याचा रक्षणकर्ता आहे.'

राजा सर्वं वृत्तान्तमाकर्ण्य आदिशत् 'यस्य समीपं हंसः गमिष्यति तस्यैव भविष्यति।'
राजाने सगळी हकीकत ऐकून आज्ञा केली, 'हंस ज्याच्याजवळ जाईल, त्याचाच होईल.'

हंसः सिद्धार्थस्य समीपं गतवान्।
हंस सिद्धार्थाच्या जवळ गेला.

सत्यमिदम् - भक्षकाद् रक्षकः श्रेयान्।
खरेच आहे – भक्षकापेक्षा रक्षणकर्ता अधिक प्रशंसनीय असतो.

११. भारतदेशेन सर्वस्मै जगते दत्तः सर्वोत्कृष्टः उपहारः नाम पञ्चतन्त्रं नाम ग्रन्थः।
भारतदेशाने संपूर्ण जगाला दिलेली सर्वोत्तम भेट म्हणजे पंचतंत्र नावाचा ग्रंथ होय.

विष्णुशर्मा नाम विद्वान् अस्य रचियता।
विष्णुशर्मा नावाचा पंडित याचा रचनाकार होता.

सः राजपुत्राणां रुचिं निरैक्षत।
त्याने राजपुत्रांच्या आवडीचे निरीक्षण केले.

तेभ्यः पशुपक्षिणां विविधाः कथाः अकथयत्।
त्यांना पशुपक्ष्यांच्या वेगवेगळ्या गोष्टी सांगितल्या.

'मनोरञ्जनाद् उद्बोधनम्' एतत् तन्त्रं प्रभावपूर्णं जातम्।
मनोरंजनातून उद्बोधन हे तंत्र प्रभावी ठरले.

कथानां माध्यमेन दत्तं ज्ञानं राजपुत्रैः विनासायासैः आत्मसात् कृतम्।
गोष्टींच्या माध्यमातून दिलेले ज्ञान राजपुत्रांनी प्रयत्न न करता (सहजपणे) आत्मसात केले.

अल्पेन एव कालेन ते राजपुत्राः राजनीतिपारङ्गताः अभवन्।
थोड्याच काळात ते राजपुत्र राजनीतिशास्त्रनिपुण झाले.

१२. एकदाः एकः नवोदितः लेखकः सुप्रसिद्धं नाटककारं राम-गणेश-गडकरी-महोदयं मिलितुम् आगतः।
एकदा एक नवोदित लेखक सुविख्यात नाटककार 'राम गणेश गडकरी' यांना भेटण्यासाठी आला.

गडकरी महोदयस्य नाटकानां काव्यप्रतिभायाः विपुलां प्रशंसा कृत्वा स अवदत्, 'भवतः साहित्यं पठित्वा अहमपि भवत्सदृशं किमपि लेखितुम् इच्छामि।
श्रीयुत् गडकरींच्या नाटकांच्या काव्यप्रतिभेची पुष्कळ स्तुती करून तो म्हणाला, 'आपले साहित्य वाचून मीही आपल्यासारखे काहीतरी लिहू इच्छितो.

भवतः मार्गदर्शनम् अहं लभेय इति आशा अस्ति।'
आपले मार्गदर्शन मला मिळेल, अशी मला आशा आहे.'

तावत्प्रथमं किं कुर्याम् अहम्? 'पुनर्विचारम्', इति गडकरी-महोदयेन उत्तरितम्।
तेव्हा मी प्रथम काय करू? श्रीयुत् गडकरी यांनी उत्तर दिले, 'पुनर्विचार'

१३. महान्तं वैज्ञानिकं सर - ऐझॅक - न्यूटनमहाशयं तस्य मार्जरशावकः विज्ञानस्य सर्वोत्तमं पाठं पाठितवान्।
महान शास्त्रज्ञ सर आयझॅक न्यूटन यांना त्यांच्या मांजराच्या पिल्लाने विज्ञानाचा सर्वोत्कृष्ट धडा शिकविला.

अभ्यासिकायां न्यूटनमहाशयः यदा पठने मग्नः तदा एव तस्य प्रिया मार्जारी अभ्यासिकायां प्रवेष्टुमिच्छति स्म।
श्री. न्यूटन जेव्हा अभ्यासकक्षात वाचन करण्यात मग्न होते, तेव्हाच त्यांची आवडती मांजर अभ्यासकक्षात येऊ इच्छित असे.

अतः न्यूटनमहाशयः अभ्यासिकाद्वारे छिद्रद्वयं कृतवान्।
म्हणून श्री. न्यूटन यांनी अभ्यासकक्षाच्या दारावर दोन भोके पाडली.

महच्छिद्रं मार्जार्याः कृते लघुच्छिद्रं शावकस्य कृते।
मोठे भोक मांजरीसाठी तर छोटे भोके पिल्लासाठी.

परन्तु यदा मार्जारी महाच्छिद्रतः अभ्यासिकायां प्रविष्टा, शावकः अपि तामेव अन्वसरत्।
पण जेव्हा मांजर मोठ्या भोकातून अभ्यासकक्षेत शिरली, तेव्हा पिल्लूही तिच्याच मागोमाग आले.

महत्तरात् छिद्राद् अपि लघुतरः प्राणी प्रवेष्टुं शक्नोति इति विज्ञानस्य सामान्यं तत्त्वं व्यस्मरत् न्यूटनमहाशयः।
मोठ्या भोकातूनही लहान प्राणी शिरू शकतो, हा विज्ञानाचा सामान्य नियम श्री. न्यूटन विसरले होते.

एतदपि क्वचित् भवति।
कधीकधी असेही घडते.

१४. सुनीता अनिता च माधवदासस्य द्वे कन्ये।
सुनीता आणि अनिता या माधवदासाच्या दोन मुली होत्या.

सुनीतायाः पतिः मालाकारः तथा अनीतायाः पति कुम्भकारः।
सुनीतेचा नवरा माळी तर अनीतेचा नवरा कुंभार होता.

एकदा सुनीता पितरम् अवदत्, 'तात, प्रभूतं पर्जन्यः वर्षतु इति मे इच्छा।
एकदा सुनीता वडिलांना म्हणाली, 'बाबा, पुष्कळ पाऊस पडावा, अशी माझी इच्छा आहे.

येन अस्माकं वनस्पतयः पर्याप्तं जलं प्राप्स्यन्ति।'
ज्यामुळे आमच्या झाडा-झुडपांना पुष्कळ पाणी मिळेल.'

तच्छ्रुत्वा समीपे उपविष्टा अनीता सत्वरम् अवदत्, 'न न। तात। अहं तु चण्डातपं कामये।
ते ऐकून जवळ बसलेली अनिता चटकन म्हणाली, 'नाही, नाही ! बाबा ! मला तर कडक ऊन पडावे; अशी इच्छा आहे.

येन अस्माकं मृद्घटाः सुरक्षिताः स्युः।'
ज्यामुळे आमचे मातीचे घडे सुरक्षित राहतील.'

उभयोः कामनाम् आकर्ण्य माधवदासः मनसि अवदत् 'किमहं वदाम्यत्र?'
दोघांची इच्छा ऐकून माधवदास मनात म्हणाला, 'आता मी काय बोलू?'

१५. राईटबन्ध्वोः प्रयोगाद् अष्टवर्षपूर्वं भारद्वाजमुनिना लिखितस्य "यन्त्रसर्वस्वम्" नाम्नः ग्रन्थाधारेण शिवकर-बापूजी-तळपदे नाम्ना केनचिद् वैज्ञानिकेन गिरगावसमुद्रतटे सफलतया विमान-उड्डान-प्रयोगः कृतः।
भारद्वाजमुनींनी लिहिलेल्या 'यंत्र सर्वस्व' नावाच्या ग्रंथांच्या आधारे 'शिवकर-बापूजी-तळपदे' नावाच्या कोण्या एका शास्त्रज्ञाने गिरगाव-समुद्रकिनाऱ्यावर यशस्वीपणे विमानाच्या उड्डाणाचा प्रयोग केला होता.

प्रयोगसमये बॅ. जयकरः, महाराजः सयाजिराय-गायकवाडः इत्यादयः मान्यवराः उपस्थिताः।
प्रयोगाच्या वेळी बॅ. जयकर, सयाजीराव-गायकवाडराजे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

दुर्दैवेन एषा महत्त्वपूर्णा घटना दुर्लक्षिता जाता।
दुर्दैवाने ही महत्त्वाची घटना दुर्लक्षिली गेली.

तळपदे महोदयेन विमानस्य इन्धनत्वेन रसः (mercury) तथा सूर्यशक्तिः (solar energy) उपयोजिते।
श्री. तळपदे यांनी विमानाचे इंधन म्हणून पारा तसेच सौरशक्ती वापरली होती.

सम्प्रति नासा (NASSA) संस्थापि तस्याः अवकाशयानानां कृते तदेव इन्धनम् उपयोजयति।
हल्ली नासा (NASSA) ही संस्थाही तिच्या अंतराळयानांसाठी तेच इंधन वापरते.

१६. 'अग्ने: पक्षा:' नाम्नि आत्मचरित्रे भूतपूर्व: राष्ट्रपति: भारतरत्न डॉ. कलाममहोदय: लिखति, 'स एव फलदायी नायक: य सामर्थ्यवतां जनानां सङ्ग्रहणं कर्तुं शक्नोति।'

'अग्निपंख' नावाच्या आत्मचरित्रात माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. कलाम लिहितात, 'तोच यशस्वी नेता होय, जो सामर्थ्यवान लोकांना एकत्र आणू शकतो.'

स निरन्तरं सङ्घटने नूतनं रक्तं युञ्जीत।

त्याने सतत संघटनेत नवीन (सळसळत्या) रक्ताचा (तरुणांचा) वापर करावा.

समस्यानां समाधानकरणे तथा नूतनकल्पनानां क्रियान्वयने स प्रवीण: स्यात्।

अडचणींचे निराकरण करण्यात तसेच नवीन कल्पनांची अंमलबजावणी करण्यात तो पारंगत असावा.

स्वस्य गणे उत्साहं पूरयितुं स समर्थ: स्यात्।

आपल्या संघात चैतन्य आणण्यासाठी तो सक्षम असावा.

यत्र यावद् आवश्यकं तत्र तावच्छ्रेय: इतरेभ्य: दद्यात्।

जेथे जेवढे आवश्यक तेथे तेवढे श्रेय त्याने इतरांना द्यावे,

सार्वजनिकतया तेषां प्रशंसा स कुर्यात् किन्तु दोषविमर्शनम् एकान्ते एव कुर्यात्।

सार्वजनिकरित्या त्याने त्यांची स्तुती करावी; परंतु दोषांची चर्चा मात्र एकांतातच करावी.

१७. कारवेल्ल - परवलादय: शाकलता: आधारीभूतजालेभ्य: अवलम्बन्ते।

कारले, पडवळ इत्यादी भाज्यांच्या वेली आधार ठरणाऱ्या जाळ्यांवरून लटकतात.

सरला: परवला: विक्रयणयोग्या: भवन्ति।

सरळसोट पडवळ विक्रीस योग्य असतात.

अत एव यदा परवला: लघु भवन्ति तदा तेषाम् एकस्मिन् अन्ते पाषाण: बध्यते।

म्हणूनच जेव्हा पडवळ लहान असतात, तेव्हा त्यांच्या एका टोकाशी दगड बांधला जातो.

तस्य भारेण परवला: वक्रा: न भवन्ति।

त्याच्या वजनाने पडवळ वाकडे होत नाहीत.

अस्माकं पुरत: वर्तमानं लक्ष्यं तस्य पाषाणस्य कार्यं करोति।

आपल्यासमोर असणारे लक्ष्य (उद्दिष्ट) त्या दगडाचे काम करते.

अयोग्यविषयान् प्रति शीघ्रम् आकृष्यमाणम् भूयमानम् अस्माकं मन: लक्ष्यस्य भारेण सर्वदा समुचितमार्गे स्थापयितुं शक्यते।

अयोग्य गोष्टींकडे चटकन आकर्षिले जाणारे आपले मन लक्ष्याच्या वजनामुळे नेहमी योग्य मार्गावर ठेवणे शक्य होते.

१८. चितोडस्य नृप: वीरवर: महाराणा प्रताप: बाल्यात्प्रभृति निर्भीक: उदारश्च आसीत्।

चितोडचा राजा वीरश्रेष्ठ महाराणा प्रताप लहानपणासून निर्भीड आणि उदार होता.

राजनि भूते सति स प्रतिज्ञाम् अकरोत्, 'तावदहं सुखानि न सेविष्ये यावद् मम देश: स्वतन्त्र: न भवति।'

राजा झाल्यावर त्याने प्रतिज्ञा केली, 'तोपर्यंत मी सुखे उपभोगणार नाही; जोपर्यंत माझा देश स्वतंत्र होत नाही.'

परेषाम् ऐश्वर्येण सुखसाधनै: स न कदापि संमोहित:।

दुसऱ्यांच्या वैभवाने, सुखसाधनांनी तो कधीही आकर्षित झाला नाही.

तस्य मन: नित्यं स्वातन्त्र्यप्राप्ते: विचारै: व्यापृतमासीत्।

त्याचे मन नेहमी स्वातंत्र्य प्राप्तीच्या विचारांनी व्यापलेले असे.

युद्धभूमौ मृत्युसमयेऽपि स देशस्य स्वाधीनताम् चिन्तयति स्म।

रणांगणावर मरणाच्या वेळीही तो देशाच्या स्वातंत्र्याचा विचार करीत होता.

मनसा स्मराम: तं महान्तं देशभक्तम्।

आपण त्या थोर देशभक्ताचे अन्त:करणपूर्वक स्मरण करूया.

१९. सुखान्वेषी वर्तते मनुजः नित्यम्।
मनुष्य नेहमी सुखशोधक असतो.

तस्य सम्यग् विकासाय यथा विज्ञानम् आवश्यकं तथा विविधाः कलाः अपि।
त्याच्या योग्य विकासासाठी जसे विज्ञान आवश्यक असते, तसेच वेगवेगळ्या कलाही !

विज्ञानस्य अधिष्ठानं बुद्धिः उद्दिष्टश्च सदसद्विवेकः।
विज्ञानाचा मूळ आधार बुद्धी असून सारासारविचारक्षमता हे उद्दिष्ट होय.

विविधानां कलानाम् उद्दिष्टं वर्तते यद् यद् मधुरं सुन्दरं समीचीनं तस्य अनुभूतिः या सुखाय कल्पते।
वेगवेगळ्या कलांचे उद्दिष्ट – जे जे आकर्षक, सुंदर आणि चांगले आहे; त्याचा अनुभव देणे जे सुखास कारण ठरते.

तथा तस्य वर्णनं येन पाशवीप्रवृत्तयः उत्तेजिताः न भवन्ति।
तसेच त्याचे वर्णन करावे जेणेकरून पाशवीवृत्ती बळावणार नाहीत.

अत एव किं न वयम् अस्माकं जीवने कलानां तथा विज्ञानस्य समन्वयं साधयामाहे?
म्हणूनच आपण आपल्या जीवनात कलांचा आणि विज्ञानाचा मिलाफ का साधू नये बरे?

२०. अधुना सर्वत्र संत गाडगेबाबा-नागरी-स्वच्छताभियानस्य प्रसारः भवति।
हल्ली सगळीकडे संत गाडगेबाबा-शहरी-स्वच्छतामोहिमेचा प्रसार होत आहे.

एतद् अभियानं तु अतीव उपयुक्तम्।
ही मोहीम अतिशय उपयोगी आहे.

स्वच्छतायाः महत्त्वं तु सर्वे जानन्ति।
स्वच्छेतेचे महत्त्व तर सगळेच जाणतात.

किन्तु न केवलं स्वगृहस्य स्वच्छता अपि तु परिसरस्य स्वच्छता अत्र अभिप्रेता।
परंतु केवळ आपल्या घराची स्वच्छताच नव्हे; तर परिसराची स्वच्छताही येथे अपेक्षित आहे.

सुहृदः, अत्र एकत्रीभूय वयं सर्वेऽस्मिन् अभियाने सहभागिनः भवेम तथा तस्य लाभार्थिनः अपि।
मित्रांनो, या ठिकाणी एकत्र जमून आपण सगळे या मोहिमेत सहभागी होऊया तसेच त्याचे लाभार्थीही बनूया.

एकस्मिन् दिने किमपि परिवर्तनं न जायते।
एका दिवसात कोणताही बदल होत नसतो.

किन्तु सर्वत्र विविधैः अल्पसमूहैः अङ्गीकृतं स्वच्छताभियानं शनैः शनैः सफलीभवेत्।
परंतु सगळीकडे वेगवेगळ्या छोट्या छोट्या गटांनी राबविलेली स्वच्छतामोहीम हळूहळू यशस्वी होईल.